अपघातीतील जखमीचा जीव वाचवणारा  एका दिव्याचा सत्कार

अपरात्री तुम्ही दमून कामावरून घरी येत असता, रस्त्यात गर्दी दिसते. इतक्या अपरात्री कसली गर्दी, असा प्रश्न मनात आला, तरी कधी एकदा घरी जाऊन अंथरुणावर पाठ टेकतो असं झालेलं असतं. गर्दीत बघायचाही मोह टाळून आपण पुढे जातो.

पण असामान्य काम करून जाणारी व्यक्ती वेगळी असते. २९ मे च्या रात्री कामावरून घरी निघालेले आकाश दत्त यांनी त्या रात्री एका माणसाला जीवदान दिलं. तेही अगदी सहज माणुसकीच्या भावनेने.

त्या रात्री, खरं तर पहाटे ३ वाजता कामावरून निघालेले २९ वर्षीय तरुण आकाश वाघोलीतील डिकॅथलॉन शोरूम जवळ त्यांना घोळका दिसला. एका अंतःप्रेरणेने ते थांबले आणि पाहिलं, तर एका व्यक्तीचा अपघात झाला होता, त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव होत होता आणि जमलेल्या २०-२५ लोकांपैकी कुणीच बघण्याव्यतिरिक्त काहीच करत नव्हते. पुढे होऊन आकाश यांनी जमलेल्या लोकांना मदतीचे आवाहन केले, पण अपघात आणि जखमी व्यक्तीची एकूण गंभीर अवस्था बघता कुणी मदत करायला धजावत नव्हते. अनेक खाजगी गाड्यांना हात दाखवूनही काही उपयोग होत नव्हता.  शेवटी पहाटे पहाटे एक भाजीचा टेंपो थांबला आणि त्यातून त्यांनी जखमी व्यक्तीला आयमॅक्सहॉस्पिटल, वाघोली येथे दाखल केले.  तिथल्या डॉक्टरांनी मात्र ताबडतोब उपचार सुरू केले आणि रक्तस्त्राव थांबवला.

आकाश केवळ जखमीला रुग्णालयापर्यंत पोचवूनच थांबले नाहीत, तर सकाळ होईपर्यंत ते त्यांच्याजवळ थांबून होते. हा अपघात झाला होता संगणक अभियंता असलेल्या राघव प्रताप सिंग यांचा. केवळ माणुसकीच्या नात्यातून श्री. आकाश यांनी राघवला मदत केली व त्याचे प्राण वाचवले.

त्यांच्या या उल्लेखनीय कामाबद्दल सेव्ह लाइफ फाउंडेशनने पुण्याचे पोलीस आयुक्त श्री. डॉ.के.व्यंकटेशम, सह पोलीस आयुक्त,रविंद्र शिसवे, आणि पोलीस उपायुक्त, वाहतूक, श्री. पंकज देशमुख यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन श्री.  आकाश दत्त यांचा गौरव केला आहे. या प्रसंगी स्वतः श्री. राघव प्रताप सिंग, श्री. मोनी जॉर्ज आणि श्रीमती रीना जॉर्ज उपस्थित होते.

रस्त्यात मदतीसाठी न थांबणाऱ्या गाड्या, बघे यांच्या तुलनेत भाजीवाला, डॉक्टर, आकाश यांचे काम विशेष उल्लेखनीय ठरते.

सेव्ह लाइफ फाउंडेशनचे श्री. देवेंद्र पाठक व त्यांचे सहकारी पुण्यात वाहतुकीचे नियम व अपघातग्रस्तांना त्वरित मदत या विषयावर जनजागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर करत आहेत. परंतु त्यांच्या जोडीला सर्वच नागरिकांनी आपपलाजबाबदारीचा वाटा उचलायला हवा असं मत श्री. डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त,पुणे शहर  यांनी व्यक्त केल.


HOLD THAT THOUGHT

